| | | |
|---|---|---|
| महाराष्ट्र पोलीस | **वाहतुक शाखा, पुणे शहर**<br>**पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,**<br>**बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे** | |

जावक क्रमांक –पोउपआ/वाह/नियो./ ६८१५ /२०२३ दिनांक :-२२/०९/२०२३

**-: प्रसिध्दीपत्रक :-**

**विषय :- गणेशोत्सव कालावधीतील बंद रस्ते व पर्यायी मार्ग**

सन २०२३ चा गणेशोत्सव दिनांक १९/०९/२०२३ ते दिनांक २८/०९/२०२३ या कालावधीमध्ये साजरा होत असुन शहरात ठिक-ठिकाणी श्रींच्या मुर्तींची प्रतिष्ठापना करण्यात आलेली आहे. त्याच बरोबर मोठया प्रमाणात देखावे व रोषणाई करण्यात आलेली आहे. सदरची रोषणाई व देखावे पाहण्यासाठी शहरातील व शहराबाहेरील नागरीक मोठया प्रमाणात येतात. त्यामुळे रहदारीचा ताण वाढतो, वाहतूकीची काही प्रमाणात कोंडी तसेच वाहतुक संथ होते, ही कोंडी व गैरसोय टाळणेसाठी त्याचप्रमाणे नागरीकांना गणेशोत्सवाचा आनंद लुटता यावा व वाहतुक सुरक्षीत, सुरळीत राहणेकरीता महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए.०१९६/ ८७१/सीआर-३७/टिआरए-२,दिनांक-२७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी विजयकुमार मगर, पोलीस उप आयुक्त, वाहतुक शाखा पुणे शहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा.फायरब्रिगेड,पोलीस वाहने,रुग्णवाहिका इ.) खेरीज करुन खालील रस्त्यांवर **आवश्यकते प्रमाणे दिनांक २३/०९/२०२३ ते २७/०९/२०२३ पर्यंत दररोज सायंकाळी १७.०० ते गर्दी संपेपर्यंत आवश्यकतेनुसार** सर्व प्रकारच्या वाहतूकीस बंदी करण्यात येत आहेत.

| अ.नं. | वाहतूकीस बंद रस्ते | पर्यायी मार्ग |
|---|---|---|
| १. | **लक्ष्मी रोड :** हमजेखान चौक ते टिळक चौक | १. डुल्या मारुती चौक उजवीकडे वळून दारूवाला पुल मार्गे इच्छितस्थळी<br>२.हमजेखान चौक डावीकडे वळून महाराणा प्रताप रोडने सरळ घोरपडी पेठ पोलीस चौकी पुढे शंकर शेठ रोडने इच्छित स्थळी जावे.<br>३.सोन्यामारुती चौक डावीकडे वळुन मिर्जा गालीब रोड जंक्शन उजवीकडे वळुन मंडई डावीकडे वळून शिवाजी रोडने स्वारगेट |
| २. | **शिवाजी रोड :** गाडगीळ पुतळा ते जेधे चौक | १.शिवाजीनगरवरुन स्वारगेट कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांनी स.गो.बर्वे चौक-जे.एम.रोड-अलका चौक - टिळक रोड किंवा शास्त्री रोडचा वापर करावा किंवा सिमला चौक-कामगार पुतळा चौक- शाहीर अमर शेख चौक -बोल्हाई चौक मार्गे नेहरु रोडचा वापर करुन स्वारगेटकडे जाणाऱ्या रस्त्याचा वापर करावा.<br>२.कुंभारवेस चौक- पवळे चौक, साततोटी चौक, योजना हॉटेल उजवीकडे वळून देवजी बाबा चौक, हमजेखान चौक, महाराणा प्रताप रोड मार्गे घोरपडी पेठ पोलीस चौकी, घोरपडी पेठ उद्यान, झगडे आळी ते शंकर शेठ रोड.<br>३. वाहतुकीचे परिस्थिनुसार दुचाकी वाहने ही गाडगीळ पुतळा, लालमहल पर्यंत सोडण्यात येतील तेथून दुचाकी वाहनचालकांनी डावीकडे वळण घेवून फडके हौद चौक मार्गे दारुवाला पुल मार्गे इच्छितस्थळी |
| ३. | **बाजीराव रोड :** पूरम चौक ते आप्पा बळवंत चौक | पूरम चौक, टिळक रोडने टिळक चौक उजवीकडे वळून केळकर रोडने आप्पा बळवंत चौक. |

टिप :- पूरम चौक ते गाडगीळ पुतळा दरम्यान जाणेसाठी करण्यात आलेली एकेरी वाहतूकीचे रस्त्यावर टेलिफोन भवन ते पूरम चौक या दरम्यानचे रस्त्यावर वरील नमूद कालावधीत तात्पुरता एकेरी वाहतूक आदेश शिथील करून दुहेरी वाहतूक करण्यात येईल.

Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| ५. | टिळक रोड : मराठा चेंबर्स ते हिराबाग चौक | जेधे चौक, नेहरू स्टेडीयम समोरील एकेरी मार्गाने जमनालाल बजाज पुतळा उजवीकडे वळून पूरम चौक व हिराबाग |

➢ टिप :- पी.एम.पी.एम.एल. व तीन आसनी रिक्षा खेरीज सर्व प्रकारच्या वाहनांना बंद.

| | | |
|---|---|---|
| ६. | सिंहगड गॅरेज, घोरपडी पेठ ते राष्ट्रभूषण ते हिराबाग चौक | सिंहगड गॅरेज चौकातून सरळ मन्साराम नाईक रस्त्याने डॉ.कोटनीस हॉस्पीटल शिवाजी रस्ता क्रॉस करून शिंदे आळीतून बाजीराव रस्ता क्रॉस करून भिकारदास चौकी चौक, खजीना विहीर चौकातुन वळून टिळक रोडने वाहन चालकांनी इच्छित स्थळी जावे. |
| ७. | दिनकर जवळकर पथ ते पायगुडे चौक (जोशी आळी) हिराबाग चौक | दिनकरराव जवळकर पथने सरळ बाजीराव रोड डावीकडे वळून टेलिफोन भवन त पूरम चौक, टिळक रोडने वाहन चालकांनी इच्छित स्थळी जावे. |
| ८. | कै.अनंत बाळकृष्ण नाईक पथ (जगदीश गॅरेज उप-रस्ता) ते टिळक रोडकडे जाण्यास बंदी | लहान रस्ता असल्याने पर्यायी मार्ग दिलेला नाही. (गल्ली आहे.) |
| ९. | सणस रोड : गोटीराम भैय्या चौक ते गोविंद हलवाई चौक | गोटीराम भैय्या चौक, गाडीखाना, सुभेदार तालीम, डावीकडे वळून कस्तुरे चौक, डावीकडे वळून गोविंद हलवाई चौक या रस्त्याचा वापर करावा. |
| १० | पानघंटी चौक ते गंज पेठ चौकी | पानघंटी चौक, जैन मंदीर चौक, फुलवाला चौक, कस्तूरे चौक, उजवीकडे वळून गंज पेठ चौकी मार्गे इच्छित स्थळी जावे. |
| ११ | गंजपेठ चौकातुन वीर लहुजी वस्ताद तालीमकडे जाण्यास बंदी | लहान रस्ता असल्याने पर्यायी मार्ग दिलेला नाही. (अरूंद आहे.) |
| १२ | गावकसाब मशिद ते सेंट्रल स्ट्रीट चौकी | अ. गावकसाब मशिद, बाबाजन चौक, सरबतवाला चौक, सेंट्रल स्ट्रीट चौकी,<br>ब. गावकसाब मशिद, सेंट्रल स्ट्रीट, इंदिरा गांधी चौक, डावीकडे वळून भगवान महावीर चौक मार्गे इच्छित स्थळी जावे. |
| १३ | कोहिनुर चौक ते बाबाजान चौक | कोहिनुर चौक, भगवान महावीर चौक, डावीकडे वळून सरबतवाला चौक डावीकडे वळून बाबाजान चौक या पर्यायी मार्गाचा वापर करावा. |
| १४ | जेधे प्रसाद रस्ता / सुभानशहा रस्ता, पार्श्वनाथ चौक (नाईक हॉस्पीटल) ते शास्त्री चौक, सुभान -शहा दर्गा ते सोन्या मारूती चौक | पार्श्वनाथ चौक (नाईक हॉस्पीटल) डावीकडे वळून सुभेदार तालीम चौक, सरळ शिवाजी रोडने शिंदे आळीतून इच्छित स्थळी जावे. किंवा पार्श्वनाथ चौक, फुलवाला चौक, कस्तूरे चौक मार्गे इच्छित स्थळी जावे. |
| १५ | गुरूनानक पथ हमजेखान चौक ते देवजीबाबा चौकाकडे जाणेसाठी वरील नमूद कालावधी व वेळे पुरता प्रवेश बंद मधून जाणेकरीता परवानगी देण्यात येत आहे. | |
| १६ | वरील बंद केलेल्या मार्गावर सदर मार्गास मिळणारे उप-रस्ते गल्ली मधून स्थानिक वाहतूक व्यतिरीक्त येण्यास मनाई करण्यात येत आहे. | |
| १७ | नो-पार्कींग बाबत- १) शिवाजीरोड- जिजामाता चौक ते मंडई चौक<br>२) मंडई ते शनिपार चौक<br>३) बाजीरावरोड- शनिपार ते फुटकाबुरूज पर्यंत<br>४) आप्पा बळवंत ते बुधवार चौक पर्यंत<br>(वरील मार्गावरील रस्त्याचे दोन्ही बाजुस नो- पार्कींग करण्यात आले आहे) | |

Scanned with OKEN Scanner

गणेशोत्सवाचे काळात दिनांक २३/०९/२०२३ ते २७/०९/२०२३ या दरम्यान सायंकाळी १७.०० ते गर्दी संपेपर्यंत कुमठेकर रस्ता, सदाशिवपेठ, फडके हौद रस्ता, सिंहगड गॅरेज ते म.न.पा. कार्यशाळा चौक (नाईक रस्ता) व कोहिनुर हॉटेल ते भगवान महावीर चौक, (एम.जी.रोड) या मार्गावरील एकेरी वाहतूकीचे आदेश गरजेनुसार तात्पुरत्या स्वरुपात शिथील केले जातील.

पादचा-यांची गर्दी लक्षात घेऊन सायं. १७.०० नंतर **आवश्यकतेप्रमाणे** वाहतूकीस बंदी घालण्यात येईल अथवा वाहतुक पर्यायी मार्गाने वळविली जाईल. तरी नागरीकांनी बंदी घातलेल्या मार्गावरुन वरील कालावधीत वाहने घेवून न जाता नमूद केलेल्या पर्यायी मार्गांचा किंवा अन्य मार्गांचा वापर करावा असे आवाहन वाहतूक शाखेतर्फे करण्यात येत आहे.

( विजयकुमार मगर )
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक
पुणे शहर

<u>प्रत</u> :- १.जिल्हा प्रसिध्दी अधिकारी पुणे-१,स्थानिक वृत्तपत्रात बातमी स्वरुपात प्रसिध्दी देणेकामी
२.सहाय्यक पोलीस आयुक्त,परिमंडळ-१,२,३ वाहतुक शाखा पुणे शहर
३.सर्व प्रभारी अधिकारी, वाहतुक शाखा पुणे शहर

प्रत
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा पुणे शहर

Scanned with OKEN Scanner